# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): वाशिम P.S. (पोलीस ठाणे): शिरपूर Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0254 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 05/06/2026 01:54 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): गुरूवार | Date from (दिनांक पासून): 04/06/2026 | Date To (दिनांक पर्यंत): 04/06/2026

Time Period (कालावधी): प्रहर ६ | Time From (वेळेपासून): 16:32 तास | Time To (वेळेपर्यंत): 16:51 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 04/06/2026 Time (वेळ): 23:52 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 028 Date and Time (दिनांक आणि वेळ): 04/06/2026 23:52 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 08 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): ढोरखेडा ,मालेगाव

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): अल्का मोहन गायकवाड

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1988 (d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशि, वाशिम, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशि, वाशिम , शिरपूर, वाशिम, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8329033177

3/9

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्तात्रय शंकरराव मिटकरी | | | 1. Town/Village (शहर / गाव): ढोरखेडा,Tehsil (तहसील): मालेगाव,Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): वाशिम,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ.सुनिता दत्तात्रय मिटकरी | | | 1. Town/Village (शहर / गाव): ढोरखेडा,Tehsil (तहसील): मालेगाव,Police Station (पोलीस ठाणे): District (जिल्हा): वाशिम,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 25,000 | 25,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 25,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

लाप्रवि वाशिम

दिनांक:-04/06/2026



नांव:- अल्का मोहन गायकवाड, वय -38 वर्शे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम, मो.नं.8329033177

मी आज रोजी सरतर्फे समक्ष फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणुन 03/09/2024 पासुन कार्यरत आहे. दि. 01/06/2026 रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उपअधिक्षक श्री परदेषी यांनी फोनव्दारे माहिती दिली की,ईसम नामे संदिप सावळे रा.रिधोरा हा तक्रारदार सुमेध वानखडे यांचेसह लाचमागणी तक्रार असल्याने मा.अपर पोलीस अधिक्षक सो.लाप्रवि अमरावती विभाग ,अमरावती यांना भेटला व तो आजरोजी तक्रार देण्याकरीता आपले लाप्रवि वाशिम कार्यालयात येणार आहे.तसेच मी तुम्हाला त्यांचा फोन नंबर पाठवितो तुम्ही त्यांचेसोबत संपर्क करा पोलीस उपअधिक्षक साहेब यांचे सुचनेवरून आम्ही मा.सहायक राज्यकर आयुक्त(प्रशा) वस्तू व सेवा कर कार्यालय,वाशिम यांना दिनांक.01/06/2026 रोजी पत्र देवुन शासकीय पंच मिळण्याकरीता पत्र देउन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले. परंतू आम्ही दि.01/06/2026 रोजी तक्रारदार यांना संपर्क साधला असता त्यांना अमरावती येथून येण्यास उशिर झाल्याने ते दि.2/6/2026 रोजी येणार असल्याचे कळविले.

दि.02/06/2026 रोजी संदिप सावळे हे तक्रारदारासह दुपारी 16.00 वा दरम्यान लाप्रवि कार्यालय वाषिम येथे हजर आले. आम्ही हजर असलेल्या पंचांचा तक्रारदार यांना परिचय करून देवून पंचासमक्ष तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारले असता तक्रारदार यांनी त्यांचे नांव सुमेध अशोक वानखडे ,रा.अनसिंग असे सांगून त्यांचेसोबत आलेल्या ईसमाचे नांव संदिप सावळे,रा.रिधोरा ता.मालेगांव जि.वाशिम असे सांगून परिचय करून दिला. आम्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना त्यांची तक्रार सांगण्यास बोललो असता तक्रारदार यांनी त्यांचे सोबत असलेले संदिप सावळे यांचेसमोर त्यांना लाचमागणी होत असल्याची तक्रार तोंडी सांगून लेखी तक्रार लिहून दिली ती पुढीलप्रमाणे, "

मी वरिल विशयान्वये तक्रार सादर करतो की,मी अब्दुल कलाम आझाद मजूर कामगार सहकारी संस्था षिरपूर ,ता.मालेगांव जि.वाशिम या संस्थेमध्ये संचालक पदावर मागील 5 वर्षापासून आहे. आमच्या संस्थेचे अध्यक्ष संदिप सावळे रा.रिधोरा हे आहेत. आमच्या संस्थेची शासकीय कार्यालयातील कामे अध्यक्षांचे आदेषाने मी करीत असतो. आमच्या संस्थेला जि.प.वाशिम अंतर्गत मौजे ढोरखेडा येथे माधव सावळे ते जि.प.शाळे मागे बंदिस्त नाली चे बांधकाम करणे हे काम मिळालेले आहे. त्यानुसार संस्थेमार्फत नालीचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. सदरचे नाली बांधकाम सुरवातीपासून ते शेवटपर्यंत मी स्वतः हजर राहून पूर्ण करून घेतले आहे सदरहू केलेल्या कामाचे मंजूर झालेले देयक मिळण्याकरीता गामपंचायत पाणीपूरवठा विभाग मार्फत जिल्हा परषद वाशिम कडे देयक बिल मिळण्याकरीता फाईल सादर केली होती परंतू हस्तांतरण पावती वर गावाचे सरपंच यांची स्वाक्षरी नसल्यामुळे सदर बिल त्रूटीमध्ये परत करण्यात आले आहे.

बिलाची 3,84,166 रू रक्कम ही संस्थेच्या खात्यात जमा होण्याकरीता हस्तांतरण पावतीवर ग्राम पंचायतचे सचिव तसेच सरपंच यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.हस्तांतरण पावतीवर

ढोरखेडा गावचे सचिव यांची स्वाक्षरी झालेली आहे परंतू हस्तांरण पावतीवर सरपंच यांची स्वाक्षरी करण्याकरीता सरपंच नामे सौ.सुनिता बबन मिटकरी यांचे पती बबन मिटकरी हे मंजूर बिलाचे रकमेच्या 10 टक्के रक्कम म्हणजेच 40,000/रू ची मागणी करीत आहेत. सरपंच यांची स्वाक्षरी असल्याशिवाय जिल्हा परिशद पाणीपुरवठा विभाग वाशिम यंाचेमार्फत केलेल्या बांधकामाचे बिल संस्थेच्या खात्यात जमा होणार नाही.

सदर कामाचे हस्तांतरण पावतीवर सही करण्याकरीता सरपंच यांना पैसे दयावे लागत नाहीत हे मला माहिती आहे. सरपंच पती बबन मिटकरी हे मला बिलाच्या 10 टक्के रक्कम म्हणून 40,000/-रू लाचेची मागणी करीत आहेत. हस्तांतरण पावतीवर स्वाक्षरी करतेवेळेस तुम्हाला पैसे देतो असे मी नाईलाजाने बबन मिटकरी यांना बोललो होतो . मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.

बबन मिटकरी ,सरपंच पती ग्राम ढोरखेडा,ता.मालेगंाव जि.वाशिम यांचेवर लाचमागणी कार्यवाही होण्याकरीता तक्रार देत आहे. उदया दि.3/6/2026 रोजी संस्थेचे अध्यक्ष संदिप सावळे यांचेसोबत मी बांधकामाचे हस्तांतरण पावतीवर सरपंच यांची सही घेण्याकरीता जाणार आहे.त्यांनी त्यावेळी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कारवाई करण्यात यावी.तक्रारीसोबत हस्तांतरण पावतीची नक्कल प्रत तसेच नाली बांधकामासंबंधीची आवष्यक कागदपत्रे देत आहे.“ तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवर तक्रारदार यांनी स्वतः,दोन्ही पंचानी व समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली. आम्ही तक्रारदार यांना सरपंच यांचे पती हे लाचेची मागणी करतात किंवा नाही ? हे पडताळण्याकरीता त्यांची सरपंच पत्नी यांची देखील पडताळणी करणे आवष्यक असल्याचे पंचासमक्ष तक्रारदार यांना सांगितले. तसेच लाचमागणी चे तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सरपंच व त्यांचे पती यांची कधी व कोठे ? भेट होईल अशी विचारणा केली असता तक्रारदार बोलले की,सरपंच यांचे घरी ढोरखेडा येथे सरपंच व त्यांचे पती दोघांची भेट होवू शकते. परंतू आजरोजी खूप उशीर झाला असल्याने तसेच सदर गांव हे दूर असल्याने उदया सकाळी पडताळणी करण्यात यावी व सदर पडताळणी करीता मालेगांव येथे पंचासह येण्याची विनंती केली.

दि.3/6/2026 रोजी सकाळी 6.00 वा चे सुमारास आम्ही,पोलीस उपअधिक्षक श्री परदेशि साहेब,दोन्ही शासकीय पंच,लाप्रवि स्टाफ असे पडताळणी करीता लागणा-या सर्व साहित्य तसेच प्रिंटर व लॅपटाॅपसह शासकीय वाहनाने मालेगांव करीता रवाना झालो. रस्त्यामध्ये तक्रारदार यास संपर्क केला असता त्यांनी अकोला नाका मालेगांव येथे थांबून असल्याचे सांगितले वरून आम्ही सर्व अकोला नाका मालेगांव येथे गेलो असता तक्रारदार व संदिप सावळे दोघे अकोला नाका मालेगांव यांची भेट झाली.तक्रारदार यांचे म्हणण्याप्रमाणे आम्ही सर्व लाप्रवि टिम त्यांचे पाठीमागे सरपंच यांचे गावाचे जवळ असलेल्या बोराळा फाटा चे रस्त्याने असलेल्या शेतशिवार येथे जावून थांबलो. तिथे आम्ही तक्रारदार व पंच क्र.01 यांना सूचना दिली की, ढोरखेडा येथील सरपंच व त्यांचे पती बबन मिटकरी हे बांधकामाच्या हस्तांतरण पावतीवर सरपंच यांची सही करण्याकरीता तक्रारदार यांना 40,000/-रू लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र.01 यांना सरपंच व त्यांचा पती यांची भेट घेवून बोलणी करणेकरीता ढोरखेडा येथे सरपंच यांचे घरी पाठविण्यात येणार असून तक्रारदार यांनी सरपंच व त्यांचे पती यांची भेट घेउन बोलनी करावी. परंतू तक्रारदार यांनी पडताळणी चे वेळी त्यांचे सोबत संदिप सावळे यांना देखील येवू देयावे अशी विनंती

केली.तक्रारदाराचे विनंतीवरून संदिप सावळे यांना पडताळणीकरीता पाठविण्याचे ठरविण्यात आले.

तक्रारदार यांना त्यांचे शर्टाचे आतुन बनीयानला व्हाईस रेकाॅर्डर लावले व पंच क्र.01 यांचे सह ग्राम ढोरखेडा चे सरपंच व त्यांचे पती बबन मिटकरी यांचे भेटीकरीता पाठविले. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र.01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. पडताळणी दरम्यान तक्रारदार,संदिप सावळे व सरपंच पती बबन मिटकरी यांची ग्रामपंचात ढोरखेडा येथे भेट झाली भेटी दरम्यान ते सरपंच पती बबन मिटकरी यांचे घरी गेले. बबन मिटकरी यांचे घरी गेल्यानंतर सरपंच पती बबन मिटकरी यांनी तक्रारदार यांचे अब्दूल कलाम मजूर कामगार संस्था षिपूर ता.मालेगांव जि.वाशिम कडून मौजे ढोरखेडा येथे केलेल्या नालीच्या बांधकामाचे पैसे संस्थेच्या खात्यात जमा होण्याकरीता हस्तांतरण पावतीवर सरपंच सौ.सुनिता बबन मिटकरी यांची स्वाक्षरी करण्याकरीता बोलणी केली, तक्रारदार हे बबन मिटकरी,सरपंच पती यांना म्हटले राम राम... त्यावर सरपंच पती बबन मिटकरी हे तक्रारदार यांना म्हटले राम राम.....बोलणं असे म्हटले असता तक्रारदार हे बबन मिटकरी,सरपंच पती यांना म्हटले काई नाइ कामासाठी आलोनं...... ते नालीचं त्यावर सरपंच पती बबन मिटकरी हे तक्रारदार यांना म्हटले आपण बोलत होतो त्याच कामासाठी म्हणलं.. तेच म्हणत होतो तुम्हालं मी असे म्हटले असता संदिप सावळे हे बबन मिटकरी,सरपंच पती यांना म्हटले किती म्हणलं... त्यावर बबन मिटकरी हे यांनी म्हटले की, चाळीस हजार... त्यावर तक्रारदार हे बबन मिटकरी,सरपंच पती यांना म्हटले चाळीस हजार लय होतात नं सरपंच.... त्यावर बबन मिटकरी,सरपंच पती म्हटले की, तुम्ही दामुल एक फोन लावा....फोन लावा....विचारून घ्या.. तुम्ही दिलते की नाई मुनं.....संदिप सावळे यांनी बबन मिटकरी सरपंच पती यांना म्हटले की, सरपंच ताई त्यावर बबन मिटकरी,सरपंच पती म्हटले की, नाई ती सेवेलं गेली शेगावलं.....तुम्ही ठेवून द्या मी सही करून ठेवतो त्यावर संदिप सावळे यांनी बबन मिटकरी सरपंच पती यांना म्हटले की शिक्का मारायल सांगजा.....यावर बबन मिटकरी,सरपंच पती म्हटले की हो ...दोन्ही शिक्के मारतो..... त्यावर तक्रारदार म्हटले की, जिल्हापरीषदेवर क्लोजींग रायते नं.... नाई आठ दिवसात होयुन जाईल.....दिड महिना दोन महिने झाले .....यावर बबन मिटकरी,सरपंच पती म्हटले की तुमच्या हिशोबान सांगा.....म्या चाळीस.... त्यावर संदिप सावळे यांनी बबन मिटकरी सरपंच पती यांना म्हटले की नाई ...कस हाय आपले नेहमीचे काम पडतात....एकदाचं....यावर बबन मिटकरी,सरपंच पती म्हटले की दहा गेले बाबा...तिस द्या....बस त्यावर संदिप सावळे यांनी बबन मिटकरी सरपंच पती यांना म्हटले की तिस हजार नाही.. विस हजार करुन टाका .....यावर बबन मिटकरी,सरपंच पती म्हटले की नाही नाही ... जाउदया पंचविस दया बस.... त्यावर संदिप सावळे यांनी बबन मिटकरी सरपंच पती यांना म्हटले की ठिक हे तुमची ताईची सही घ्या मंग .....यावर बबन मिटकरी,सरपंच पती म्हटले हो मिच येतो... फोन करतो.... तक्रारदार यांचे हस्तांतरण पावतीवर सरपंचाची सही/शिक्का साठी 40,000 /- रुपये लाचेची मागणी करून तडतोडी अंती 25,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य करून लाचेची मागणी केली.

त्यानंतर आम्ही सांगीतले की,सरपंच सौ सुनिता मिटकरी यांची पडताळणी झाली नाही त्यांची पडताळणी आवश्यक असल्याने तक्रारदार यांना पंच क्र.01 व संदिप सावळे यांचे सह सरपंच सौ.सुनिता मिटकरी यांचे पडताळणी करीता काही तासाने पाठवीले. तक्रारदार, पंच क्र.01 व संदिप सावळे यांची भेट सरपंच सौ सुनिता मिटकरी यांचेशि त्यांचे ढोरखेडा येथील घरी झाली. भेटी



6/9

दरम्यान तक्रारदार हे सरपंच सौ सुनिता मिटकरी यांना म्हटले की, सकाळी आलतो... सकाळी मिटकरी साहेबालं भेटलो ...त्यावर.सरपंच सौ सुनीता मिटकरी म्हटल्या....हं त्यावर संदिप सावळे सरपंच सौ सुनिता मिटकरी यांना म्हटले की, दोन प्रतीत आहे... मंघा ते घाई गडबडीत एकच पावती देली होती तक्रारदार हे सरपंच सौ सुनिता मिटकरी यांना म्हटले की बाकी ते बोलनं झालं ते देण्या घेण्याचं... त्यावर सरपंच सौ सुनिता मिटकरी यांनी म्हटले की, बर. बरं..... तक्रारदार हे सरपंच सुनिता मिटकरी यांना म्हटले की,25,000 रुपये सकाळी सांगीतले त्यानां दयायचे...देतो म्हणलं त्यावर सरपंच सुनिता मिटकरी या म्हटल्या की ते करतात काय करायचं ते... त्यावर संदिप सावळे म्हणाले की, हस्तांतरण पावती हे... तक्रारदार सरपंच सौ सुनिता मिटकरी यांना म्हटले की, त्रुटीत आलं तुमच्या सही साठी.... देण्या घेण्याशिवा होतं नाही नं गोष्टी यावर सरपंच सुनिता मिटकरी या म्हटल्या की ते मानंसच पाहयतात... तक्रारदार यांचे हस्तांतरण पावतीवर सही करण्यासाठी सरपंच सौ सुनिता मिटकरी यांनी लाचेसंबधाने सहमती दर्शवीली. पडताळणी कारवाईमध्ये बबन मिटकरी यांनी उदया भेटतो किंवा फोन करुन सांगतो असे सांगीतल्याने त्यानुसार दि. 04/06/2026 रोजी सरपंच पती बबन मिटकरी व सरंपच सौ सुनिता दत्तात्रय मिटकरी यांचेवर ग्राम ढोरखेडा येथे सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दि. 04/06/2026 रोजी सापळा कारवाई करीता आम्ही पोनि गायकवाड, पोलीस उपअधिक्षक श्री परदेशि सर,लाप्रवि पथक, दोन्ही पंच व तक्रारदार,संदिप सावळे असे सापळा कारवाई करीता बोराळा फाटा शेतशिवार येथे हजर असतांना तक्रारदार यांना 25,000/- रु लाच रक्कम हजर करण्यास सांगीतली असता. तक्रारदार यांनी 25,000/- रु लाच रक्कम हजर केली. तक्रारदार यांनी हजर केलेल्या 25,000/-रु रक्कमेस पंचासमक्ष अॅन्थ्रॉसिन पावडर लावण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन सापळा कारवाई सरंपच सौ.सुनिता बबन मिटकरी यांचे ग्राम ढोरखेडा येथील राहते घरी आयोजीत करण्यात आली. तक्रारदार यांना लाच रक्कमेसह तसेच व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र.01 सह तक्रारदार यांचा मित्र संदिप सावळे यांच्या मोटर सायकलवर पाठविले. त्याचे मागोमाग सापळा पथक ग्राम ढोरखेडा येथे दबा धरुन बसले. सरपंच सौ.सुनिता बबन मिटकरी यांची ग्राम ढोरखेडा येथील त्यांचे राहते घरीे भेट झाली. बबन मिटकरी हे घरी हजर नव्हते. भेटी दरम्यान सरपंच सौ सुनिता मिटकरी यांनी तक्रारदार यांचे कडुन 25,000/- रु लाच रक्कम पंच क्र.01 समक्ष अंदाजे 16/51 वाजताचे सुमारास स्विकारली. तक्रारदार यांनी ठरल्याप्रमाणे सरंपचाचे घरा बाहेर येवुन त्यांचे गळयातील शेला हातात घेवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पूर्व नियोजीत इषारा केला. त्यावरून तात्काळ आम्ही, सापळा पथक असे सरंपच सौ.सुनिता मिटकरी यांचे घरी पोहचुन सरपंच सौ.सुनिता बबन मिटकरी यांना 25,000/रू लाच रक्कमेसह ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन लाच रक्कम हस्तगत केली व त्यांना ताब्यात घेतले. सौ.सुनिता बबन मिटकरी,सरपंच ग्राम ढोरखेडा यांना पुढिल कारवाई करीता पो.स्टे.शिरपुर येथे आणण्यात आले.

सरपच पती दत्तात्रय उर्फ बबन शंकरराव मिटकरी, वय-अंदाजे 55 वर्षे,खाजगी इ रा.ढोरखेडा ,ता.मालेगाव जि.वाशिम यांनी तक्रारदार यांचे बांधकामाचे बिलाचे हस्तांतरण पावतीवर सरपंच यांची सही करण्याकरीता दि.03/06/2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान 40,000/- रुपये लाचेची स्पष्ट मागणी करुन तडजोडीअंती 25,000/- रुपयेची स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सरपंच

7/9

सौ.सुनिता दत्तात्रय मिटकरी यांनी दि.03/06/2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लाच रक्कमेस सहमती दर्शवुन दि. 04/06/2026 रोजी सापळा कारवाई 16:32 वा. ते 16/51 वा. दरम्यान 25,000/-रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यांचे हे कृत्य कलम 7, 7A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकातर्फे कायदेशिर फिर्याद आहे अशा लेखी फिर्याद वरुन मा पो नी सा आधेशाने सदर चा गुन्हा दाखल

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिकाऱ्याचे नाव):** **Rank (हुद्दा):** पोलीस शिपाई
RAMESHWAR VASUDEO JOGDAND

**No. (क्र.):** POBN43869 **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature [illegible] Police Station**
**(ठाणे प्रभारी अ[illegible] स्वाक्षरी)**

**Name (नाव):** keshav Vitthal wagh

A.M.Gaikwad

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):